# कौटुंबिक पातळीवरील जबाबदारी

- सामुहिकपणे आपत्तीशी सामना करावा लागतो. तरीही एक स्वतंत्र व्यक्ती आणि कुटुंब म्हणूनही काही जबाबदारी स्वीकारुन, ती पार पाडावी लागते.
- गावातील कृती गटाने गावकऱ्यांच्या वारंवार बैठका घेऊन, आपत्तीशी सामना करण्यासाठी लोकांना विश्वासात घ्यावे.
- कृती गट कोणकोणती कामे करणार आहे आणि व्यक्ती/कुटुंब म्हणून त्यांनी कोणती कामे करणे अपेक्षित आहे, याची जाणीव करुन देणे.
- कौटुंबिक पातळीवरील गावकऱ्यांची जबाबदारी

## आपत्ती पूर्व - कुटुंबपातळीवर करायची कामे -

- आपले कुटुंब जेथे राहते त्या घराचे / इमारतीचे मजबुतीकरण करुन घेणे.
- आपत्तीमुळे आपल्या अर्थाजनावर विपरित परिणाम होऊ नये म्हणून पर्यायी व्यवस्था करुन ठेवणे.
- घरातील महत्वाच्या वस्तू ज्याच्याकडे सुरक्षित ठिकाण आहे त्यांच्याकडे ठेवणे.
- कुटुंबातील सर्व सदस्यांना सुरक्षित सुटका मार्गाची माहिती देऊन, संकटसमयी सगळ्यांनी स्वतःच्या सुरक्षेची काळजी घेण्याविषयी मार्गदर्शन करणे. बॅटरी व बॅटरीवर चालणारा ट्रान्झीस्टर कायम घरात ठेवणे. प्रथमोपचार-पेटी सुरक्षित ठिकाणी ठेवणे.
- पुरेसे धान्य ठेऊन, इतर साठा विकता येत असेल तर विकून टाकणे.
- घराची वारंवार दुरुस्ती करुन, घर सुरक्षित राहील याची काळजी घेणे.

## आपत्तीकाळातील कामे -

- सुरक्षित सुटका मार्गास तपास घेऊन सुरक्षित स्थळी पोहचणे.
- जडवस्तू पडून आपण अडकून पडणार नाही याची काळजी घेणे.
- बियाणे, खते, औजारे, सुकेअन्न सुरक्षित ठेवणे.
- मालमत्तेसंबंधीची कागदपत्रे सुरक्षित ठेवणे.
- रेडिओ, टी.व्ही. वरुन येणारे संदेश ऐकणे.
- कुटूंबातील सदस्यांना तीन दिवस पुरेल इतके अन्न, पाणी, इंधन सुरक्षित ठेवणे.
- पुरेसे औषध सोबत ठेवणे.
- एकत्रित जेवणावळीत सामील होणे.
- अफवांवर विश्वास न ठेवणे.
- आर.सी.सी. घर असल्यास वरच्या मजल्यावरुन तळमजल्यावर येणे.

## आपत्तीनंतरची कामे :

- कृती गटाच्या आदेशाचे पालन करणे.
- अन्न पुरवठा, परिसर स्वच्छतेसाठी स्वयंसेवक म्हणून काम करणे.
- स्वतः आणि कुटुंबिय वापरत असलेल्या शौचकुपांची सफाई अभावी दुर्गंधी व घाण वाढणार नाही याची दक्षता घेणे.
- आपल्या गरजा आणि समस्या निवारा व्यवस्थापनास सांगणे.
- गहाळ व्यक्तीबाबतची माहिती व त्याचे ठिकाण याबाबतची माहिती बचाव गटास देणे.
- त्यांच्या बचावकामासाठी संबंधित गटास पाठवणे.
- पडलेले ढीग उपसणे.
- शक्य तितक्या लवकर घराची दुरुस्ती / बांधणी सुरु करणे.